# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- २८/०२/२०१८

## *<u>अहिंसा व शांतता संदेशाव्दारे साकारणार गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड</u>*

मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख सा़ो. यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली तसेच आदर्श मित्र मंडळ पुणेचे उदय जगताप यांच्या पुढाकाराने व उडान फाऊंडेशन व लक्ष्मीनृसिंह पतसंस्था, बल्लारपुर यांच्या सहकार्याने समाजामध्ये शांतता व समता याचा प्रसार व्हावा व जगात नेहमी शांतता नांदावी या उद्देशाने अंहिसा व शांतता संदेश वाचन कार्यक्रमाचे दिनांक ३ मार्च २०१८ रोजी सकाळी ०९.०० वा. पोलीस मुख्यालय गडचिरोली येथील मैदानावर आयोजन करण्यात आले आहे.

समाजामध्ये शांतता निर्माण व्हावी यासाठी जगभरातील साधु संतानी व धर्मगुरूंनी आपल्या शिकवणीतुन दिलेल्या शांततेच्या संदेशांचे वाचन यावेळी होणार असून या कार्यक्रमास १० हजाराचे वर नागरिक सहभागी होतील असा अंदाज असून या उपक्रमाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये होणार आहे. दिनांक ०२/०२/२०१८ रोजी गडचिरोली पोलीस व आदर्श मित्र मंडळ यांच्या संयुक्त उपक्रमातून जिल्हाभरात सामाजिक सद्भावना परिक्षा घेण्यात आली होती यात १३ हजाराच्या वर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. हे सर्व विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित राहणार असून याप्रसंगी

त्यांना प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच या कार्यक्रमानिमित्याने आदिवासी समाजाचे दैवत असलेले बिरसा मुंडा यांचे वंशज या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. सदर कार्यक्रमाचे उद्धाटन मा. केंद्रिय गृहराज्य मंत्री श्री. हंसराज अहिर यांचे हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. राज्यमंत्री आदिवासी विकास व वने (महाराष्ट्र राज्य) तथा पालकमंत्री श्री. अम्ब्रीशराजे आत्राम असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) श्री. शरद शेलार, मा. पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प नागपूर श्री. अंकुश शिंदे सा◌ो. हे उपस्थित राहणार आहेत.

या ऐतिहासीक कार्यक्रमात मोठया संख्येने उपस्थित राहून इतिहासाचे साक्षीदार व्हावे व गडचिरोली जिल्हयाचे नाव अहिंसा व शांततेचा संदेश देणारा जिल्हा म्हणून जगाच्या नकाशावर झळकवावे असे आवाहन गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने करण्यात येत आहे.